आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ३० नोव्हेंबर २०२५

ठळक बातम्या

1. युवकांची निष्ठा हेच विकसित भारताचं सामर्थ्य असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं 'मन की बात' मधे प्रतिपादन.

2. राज्यातल्या २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीचा प्रचार संपायला २ दिवस शिल्लक असल्यानं प्रचार जोरात.

3. हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रम येत्या ७ डिसेंबर रोजी नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार.

4. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या सामन्यात भारताने आफ्रिकेसमोर 350 धावांचे ठेवले लक्ष्य; रोहित शर्माने वन-डेत सर्वाधिक षटकार मारण्याचा शाहिद आफ्रिदीचा विक्रम मोडला.

मन की बात

युवकांची निष्ठा हेच विकसित भारताचं सामर्थ्य असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधानांनी आज आकाशवाणीवर ‘मन की बात’ च्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. तीव्र इच्छा, सामूहिक शक्ती, आणि संघभावनेनं काम करण्यावर विश्वास असेल तर कठीण कामातही यश मिळतं असं ते म्हणाले. या संदर्भात त्यांनी इस्रोनं मंगळ ग्रहासारख्या वातावरणात जीपीएस प्रणालीशिवाय ड्रोन उडवण्याच्या स्पर्धेची चित्रफित पाहिल्याचा अनुभव सामायिक केला. या स्पर्धेत पुण्यातल्या एका संघानं यश मिळवल्याचा उल्लेख त्यांनी केला. हैदराबाद इथं विमानांच्या देखभाल, दुरुस्ती आणि संपूर्ण तपासणी केंद्राचं उद्घाटन, नौदलाच्या ताफ्यात स्वदेशनिर्मित आय एन एस माहे या युद्धनौकेचा झालेल्या समावेशाचा उल्लेखही त्यांनी केला. कृषी क्षेत्रातली देशाची प्रगतीही त्यांनी श्रोत्यांशी सामायिक केली. देशानं ३५७ दशलक्ष टन इतक्या प्रमाणात अन्नधान्याचं उत्पादन करून ऐतिहासिक विक्रम केला असल्याचं ते म्हणाले. याप्रसंगी त्यांनी नैसर्गिक शेतीच महत्व अधोरेखित केल.

*कुछ दिनों पहले मैं नैचुरल फार्मिंग के एक विशाल सम्मेलन में हिस्सा लेने कोयम्बटूर गया था। दक्षिण भारत में नेचुरल फार्मिंग को लेकर हो रहे प्रयास को देखकर मैं बहुत प्रभावित हुआ। कितने ही युवा हाइली क्वालिफाइड प्रोफेशनल अब  नेचुरल फार्मिंग फील्ड को अपना रहे। मैंने वहाँ किसानों से बात की, उनसे अनुभव जाने, नैचुरल फार्मिंग भारत की प्राचीन परंपराओं का हिस्सा रही है और हम सभी का कर्तव्य है, कि धरती माँ की रक्षा के लिये इसे निरंतर बढ़ावा दे।*

गेल्या काही वर्षांत मधाची निर्यात तीन पटीपेक्षा जास्त झाली आहे, देशाचं मध उत्पादन दीड लाख टनांपेक्षा जास्त झालं आहे, मध अभियानाअंतर्गत खादी ग्रामोद्योगानं सव्वा दोन लाखापेक्षा जास्त मधमाशी पालन पेट्यांचं वाटप केलं आहे अशी माहिती त्यांनी दिली. क्रीडा क्षेत्रातल्या यशाचा उल्लेखही त्यांनी केला. महिला कबड्डी विश्वचषक स्पर्धेचं जेतेपद, जपानमधल्या डेफ ऑलिम्पिक, तसंच जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत भारतानं मिळवलेलं यश याविषयी त्यांनी सांगितलं. दृष्टीहीन महिलांनी जिंकलेला पहिलाच टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक म्हणजे देशाच्या क्रीडा इतिहासातल्या सर्वात मोठ्या यशांपैकी एक आहे असं ते म्हणाले. मोदी यांनी  देशाचा गौरव वाढवणाऱ्या सांस्कृतिक आणि इतर घडामोडींचाही उल्लेख केला. काही दिवसांपूर्वीच साजरा झालेला संविधान दिन, तसंच वंदे मातरम् या गीताला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल देशभरात होत असलेले कार्यक्रम, अयोध्येत राम मंदिरावर धर्मध्वजाचं आरोहण, कुरुक्षेत्रातल्या पांचजन्य स्मारकाचं लोकार्पण यांविषयी त्यांनी सांगितलं. आंतरराष्ट्रीय गीता महोत्सवानिमित्तानं विविध देशांत झालेल्या कार्यक्रमांची माहिती त्यांनी दिली. राष्ट्रीय संग्रहालयातले भगवान बुद्धांचे पवित्र अवशेषांचं भूतान, रशियासह, मंगोलिया, व्हिएतनाम आणि थायलंड अशा अनेक देशांमध्ये प्रदर्शित केले जात असल्याचा उल्लेख त्यांनी केला. नुकत्याच झालेल्या जी ट्वेंटी परिषदेच्या निमित्तानंही आपण जागतिक नेत्यांना दिलेल्या भेटवस्तूंमध्ये स्थानिक भावनेवरच भर दिला असं ते म्हणाले. आगामी ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या खरेदीसाठीही नागरिकांनी देशात बनलेल्या वस्तुंची खरेदी करावी असं आवाहन त्यांनी केलं. देशाच्या हिवाळी पर्यटन क्षमतांबद्दल सांगिताना. हिवाळी पर्यटनासाठी हिमालयातील डोंगररांगाचा विचार करावा असं आवाहन त्यांनी केलं.

<u>स्थानिक स्वराज संस्था निवडणूक</u>

राज्यातल्या २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीचा प्रचार संपायला २ दिवस शिल्लक आहेत. त्यामुळं राज्यभरात सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्ते आपापल्या उमेदवारांचा प्रचार करत आहेत. तसंच प्रशासनाकडून २ डिसेंबरला होणाऱ्या मतदानाची तयारी सुरू असून, काही ठिकाणी टपाली मतदानाला सुरुवात होत आहे. दरम्यान, सर्वोच्च

न्यायालयाच्या आरक्षणा संदर्भात निर्णयाने यवतमाळ येथे सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला आहे.

<u>सर्वपक्षीय बैठक</u>

संसदेचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरु होत आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं आज सकाळी सर्वपक्षीय बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. राज्यसभेतले सभागृह नेते जे पी नड्डा, संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू आणि राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल आणि डॉ. एल मुरुगन बैठकीला उपस्थित होते. कांग्रेसचे गौरव गोगोई, शिवसेनेचे नरेश म्हस्के, द्रमुकचे तिरुचि शिवा, तृणमूलचे डेरेक ओब्रायन, इत्यादी नेते बैठकीत सहभागी झाले होते. बैठक सकारात्मक वातावरणात झाल्याचं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. या अधिवेशनात मतदार पुनरिक्षण, दिल्ली बाँम्बस्फोट तसंच परराष्ट्र संबधांबद्दल विरोधी पक्ष प्रश्न उपस्थित करतील अशी शक्यता आहे. उद्यापासून सुरु होणारं हे अधिवेशन येत्या १९ डिसेंबरपर्यंत चालेल.

<u>सुचना पुस्तिका</u>

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी मुंबई येथे अभिवादनासाठी येणाऱ्या अभ्यागतांसाठी तयार करण्यात आलेल्या सुचना पुस्तिकेचे व भित्तीपत्रकाचे प्रकाशन राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते आज राजभवन, मुंबई येथे करण्यात आले. यावेळी बोलताना राज्यपालांनी डॉ आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. ज्येष्ठ आर्य समाजी नेते आत्माराम अमृतसरी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविण्यास मदत व शिफारस केली असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत समरसता व बंधुभाव या मूल्यांच्या प्रचार प्रसारासाठी आपण विविध तालुक्यांना भेट देण्याचा उपक्रम हाती घेतला असल्याचे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

<u>डॉ.बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट</u>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचं औचित्य साधत राज्याच्या पर्यटन संचालनालयानं येत्या ३ ते ५ डिसेंबर दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीटचं आयोजन केलं आहे. मुंबईतल्या चैत्यभूमीला भेट देणाऱ्या अनुयायांसह पर्यटकांसाठी हे टूर सर्किट निःशुल्क असणार आहे. याअंतर्गत चैत्यभूमी, राजगृह, वडाळयातलं डॉ. बाबासाहेब आंबेडकर इकॉनॉमिक्स आणि कॉमर्स महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, परळमधली बीआयटी चाळ आणि फोर्टमधल्या सिद्धार्थ महाविद्यालयाचा समावेश आहे. टूर सर्कीट अंतर्गत दररोज ३ बसेस उपलब्ध करण्यात आल्या असून प्रथम येणाऱ्यांना प्रथम प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश देण्यात

येईल. सहलीमध्ये सहभागी होणारे पर्यटक/अनुयायी यांच्यासाठी निःशुल्क प्रवास, सहल मार्गदर्शक, अल्पोपहार आदी सोयी-सुविधा पर्यटन संचालनालयाद्वारे पुरविण्यात येणार आहेत. सदर टूर सर्कीटची सुरुवात चैत्यभूमी, दादर, मुंबई येथून सकाळी 9.30 वाजता होऊन सहलीचा समारोप चैत्यभूमी दादर येथे होणार आहे.

<u>हिंद दी चादर</u>

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत येत्या ७ डिसेंबर रविवार रोजी नागपूर इथ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या प्रमुख उपस्थितीत एक कार्यक्रम होणार आहे. नागपूरच्या सुरेश चंद्र सुरी ग्राउंड, जरीपटका पोलीस स्टेशन रोड, नारा इथ सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय प्रदर्शनी समितीची बैठक मुंबईत नुकतीच झाली. यावेळी नियोजनाबाबत चर्चा आणि प्रदर्शनाचे सादरीकरण करण्यात आले. राज्य प्रदर्शनी समितीच्या बैठकीत श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या छायाचित्रासह भारतीय डाक विभागामार्फत स्मृतिचिन्ह म्हणून टपाल तिकीट जारी करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कार्यक्रमात सिंधी आणि पंजाबी समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणारे ऐतिहासिक शस्त्रांचे प्रदर्शनी आयोजित करण्यात येणार शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, वाल्मिकी आणि सिंधी समाज एकत्र येऊन हा ऐतिहासिक समागम कार्यक्रम करणार आहेत. दरम्यान, श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहिदी समागम समारोहानिमित्त नागपूर येथे 350 बाईकची रॅली आज रविवार रोजी काढण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर समोरील बाबा बुधाजी नगर येथून ही रॅली सुरु होऊन जरी पटका पोलीस स्टेशन मार्ग जवळ नारा येथे या रॅलीचा समारोप झाला.

<u>क्रिकेट</u>

क्रिकेट! झारखंडमध्ये रांची इथं भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून प्रारंभ झाला. या सामन्यात नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रीकेनं प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. भारताने आफ्रिकेसमोर 350 धावांचे लक्ष्य ठेवले. विराट कोहलीने 135 धावा काढल्या तर रोहित शर्मा, के.एल राहुल यांनी अर्धशतके केली. दरम्यान, या सामन्यात माजी भारतीय कर्णधार रोहित शर्मा एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाज बनला आहे. या सामन्यापूर्वी, रोहित हा पराक्रम करण्यापासून तीन षटकार दूर होता आणि सामन्यात तीन षटकार मारून त्याने पाकिस्तानच्या शाहिद आफ्रिदीला मागे टाकले. आफ्रिदीने आपल्या

एकदिवसीय कारकिर्दीत एकूण ३५१ षटकार मारले होते. पण रोहितने आता या स्वरूपात ३५२ षटकार मारत नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. शेवटचं वृत्त हाती आले तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या २ षटकात ७ धावा आणि २ गडी बाद झाले.

<u>हवामान</u>

हवामान! विदर्भातील वाशिम यवतमाळ अमरावती गोंदिया भंडारा आणि नागपूर येथे 11 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. आज आणि उद्या चंद्रपूर यवतमाळ या जिल्ह्यात अतिशय हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची देखील शक्यता आहे.

*****